दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ३ रे अंक २२८ वा मंगळवार दि.१३ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

# शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्यास केंद्र सरकार जबाबदार- ओमराजे निंबाळकर

. धाराशिव :- केंद्र सरकारने डॉ. स्वामीनाथन यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत केले यासाठी मी केंद्र सरकारचे आभार मांडतो. मात्र डॉ. स्वामीनाथन यांनी देशातील शेतकऱ्यांसाठी ज्या सुचना व अभिप्राय सरकारला सुचवले ते सरकारने का मान्य केले नाही याचे सरकारने अधी उत्तर द्यावे व त्या शिफारशी मान्य कराव्यात. आज देशातील शेतकरी देशोधडीला लागला याला पुर्णपणे केंद्र सरकारची धोरणे जबाबदार असून ही मी काही उदाहरणा दाखल स्पष्टीकरण देत आहे. केंद्र सरकारने ७ डिसेंबर २०२३ रोजी कांद्यावर निर्बंध केली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्याचे भाव ५० ते ६० वरुन खाली आला व तो ५ ते १० रुपयापर्यंत कोसळले. त्यामुळे शेतकऱ्यांने कांदा रस्त्यावर फेकून दिला. यामुळे शेतकऱ्यांचे आतोनात आर्थीक नुकसान झाले.

केंद्र सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट तर झालेच नाही मात्र शेतकऱ्याचा उत्पादन खर्च दुप्पट झाला. डी.ए.पी. चे पोत ४८५ ला होते ते १३५० रुपयाला झालं, किटकनाशक ३०० रु लिटर ७०० रु लिटर झाले , राऊन्ड तणनाशक ३५० रुपयावरुन ६०० रु लिटर झालं, वाढत्या डिझेलच्या किमतीमुळे ६०० रु एकर नांगरणी २००० रु झाली. यासर्व बाबीमुळे शेती करण्यासाठी उत्पादन खर्च हा दुप्पट झाला मात्र शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट झाले नाही.

त्याचप्रमाणे सोयाबीन पिकाच्या बाबतीत ज्यावेळी सोयाबीनला प्रत्येक क्विंटल ११००० रु भाव होता. त्यावेळी केंद्र सरकारने सोयाबीन पामतेल, सोयापेन्ट व डी.ओ.सी. आयातीचा निर्णय घेतला त्यामुळे सोयाबीनचे दर कोसळून ४००० पर्यंत आले त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्येक क्विंटल ७००० रु नुकसान झाले. यामुळे प्रत्येक क्विंटल प्रत्येक शेतकऱ्याला ७०००/- रु इतके नुकसान सोसावे लागले. मात्र केंद्र सरकार वर्षाला या शेतकऱ्याला ६००० रु प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत देवून बोळवण करत आहे. हीच आपली शेतकऱ्या प्रती सहानभुती का?

त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या धोरणामुळे दुधाचे दर ३८ रुपयावरुन कोसळून ते २२ रुपयापर्यंत आले. यामुळे शेतकऱ्याचे आतोनात नुकसान झाले आहे. ऊसाच्या बाबतीत देखील सांगायचे झाले ऊस उत्पादक शेतकऱ्याला चांगला भाव मिळायला चालू होते त्याच वेळी केंद्र सरकारने इथेनॉल निर्मीतीवर बंदी आणल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधीक भाव मिळण्यास अडचण निर्माण झाली आहे. केंद्र सरकारला माझी विनंती आहे की, सामान्य नागरीकांना फक्त केवळ १५ टक्के साखर खाण्यासाठी लागते. बाकीची ८५ टक्के साखर कॅडबरी, कोका कोला इत्यादी मल्टीनॅशनल कंपन्याला लागते. त्यामुळे माझी केंद्र सरकारला अशी विनंती आहे की, सर्वसामान्य नागरीकांना आवश्यक असणारी १५ टक्के साखर ही रेशनकार्डवर फ्री द्यावी. मात्र कॅडबरी, कोका कोला सारख्या मल्टीनॅशनल कंपन्याना लागणाऱ्या साखरेच्या दरावर का कंट्रोल करता? या बाबतीत शेतकऱ्याच जगणं केंद्र सरकारने मान्य केले पाहिजे.

शेतकऱ्याने पिकवलेला मालाचा भाव वाढला की, आपले लक्ष त्यावर जाते व त्यावर नियंत्रण केले जाते, कांद्याची निर्यात बंधी केल्यामुळे द्राक्ष बाग शेतकऱ्यांवर बांग्लादेशने आयात शुल्क वाढवले. यामुळे शेतकऱ्याचे आर्थीक नुकसान होत आहे. त्यामुळे द्राक्ष बागायत शेतकरी आडचणीत आला. त्यामुळे माझी केंद्र सरकारला अशी विनंती आहे की, शेतकऱ्याने उत्पादीत केलेल्या मालाच्या दरावर केंद्र सरकार अशा पध्दतीने नियंत्रण करत आहे. तर आदानीच्या सिमेंटच्या भावावर सरकार का नियंत्रण करत नाही अदानीच्या सिमेंटच्या पोत्याचा भाव २०० वरुन ४५० रु झाला डिझेलच्या व सिमेंटच्या भावावर सरकार का नियंत्रण करत नाही. म्हणजे व्यवसायीकांनी उत्पादीत केलेल्या मालाच्या किंमतीवर केंद्र सरकार नियंत्रण करत नाही मात्र शेतकऱ्याने उत्पादीत केलेल्या मालावर सरकार विविध धोरण राबवून का नियंत्रण करते. अशा धोरणामुळे शेतकरी आत्महत्या वाढत आहे.



आता मी सत्ताधाऱ्यांची भाषण ऐकताना बऱ्याच गोष्टी ऐकल्या देशात मोठ मोठे हायवे झाले, देश पाच मिलीयन डॉलर्स कडे वाटचाल करत आहे व इंन्फाट्रक्चर डेव्हलपमेंट होत आहे या बद्दल आनंद होत आहे. मात्र देशातील ७० टक्के देशवासीय शेतीवर अवलंबून आहेत. मी या चर्चेच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या व्यथा मी केंद्र सरकार पर्यंत पोचवत आहे त्या केंद्र सरकारने समजून घ्याव्यात. शेती पिकली, शेतकऱ्याच्या भावाला रास भाव मिळाला, तर अर्थ व्यवस्था गजबजलेली दिसेल मात्र शेतकऱ्याच्या शेतमालाला रास्त भाव नसेल, दुष्काळ असेल सगळे व्यवसाय माशा मारत बसलेले असतात. त्यामुळे माझी केंद्र सरकारला अशी विनंती आहे की, इंन्फाट्रक्चर डेव्हलपमेंट करा मात्र हे करत असताना शेतकऱ्यासाठी महत्वपुर्ण असा नदीजोड प्रकल्प हाती घ्या बिहार व ओडीसा सारख्या राज्यात महापुर येतो व दुसरीकडे राजस्थान व महाराष्ट्र सारख्या राज्यात दुष्काळी परीस्थितीमुळे शेती परवडत नाही, शेतकऱ्याला आत्महत्या करायची वेळ येते. त्यामुळे केंद्र सरकारला विनंती आहे की, नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून हे पाणी दुष्काळग्रस्त भागता वळवावे व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देणेसाठी नदीजोड प्रकल्पा सारखा महत्वकांक्षी प्रकल्प हाती घ्यावा व शेतकऱ्यांच्या बाबतीत यतोचीत निर्णय घ्यावा.

केंद्र सरकारने सभागृहात श्वेत पत्रीका आणली मात्र अशी श्वेत पत्रीका जर इ.डी. च्या बाबतीत आणली असती तर लक्षात आल असतं की, नेमक इ.डी.ची धाड नेमकं कोणा कोणावर पडते उदाहरण म्हणून एखाद्या बिजेपी. च्या कार्यकर्तेवर तरी दाखवायला म्हणून कारवाई करायला पाहिजे होती. आज इ.डी.ची कारवाई होते व तो माणूस महायुती आला की, कारवाई थांबते. किती लोकांना नोटीसा आल्या व किती लोकावर कारवाया झाल्या व असे लोक सरकारच्या गटात सामील झाले की, कारवाया थांबतात या बाबतीत देखील इडी. ची स्वतंत्र श्वेत पत्रीका काढणे आवश्यक आहे.

राज्यातील महत्वाच्या मराठा, धनगर, कोळी, मुस्लीम समाजाच्या बाबतीत देखील आरक्षणाच्या बाबतीत केंद्र सरकार निर्णय घेणे आपेक्षीत आहे. राज्यात व देशात तुमचेच सरकार आहे, मग कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता न्याय द्यायचा असेल तर लोकसभेत कायदा करुन आरक्षणाची मर्यादा ५०% पेक्षा आधिक वाढवणे गरजेचे आहे. जेणे करुन महाराष्ट्रात समाजा-समाजामध्ये जो संघर्ष चालू आहे तो थांबेल व प्रत्येक समाजाला न्याय मिळेल.

मी आज केंद्र सरकारने लोकसभेत जी विकासाची १० वर्षाच्या श्वेतपत्रीकेवर चर्चा आणली त्यावर मी महत्वाचे मुद्दे मांडत आहे. या बाबतीत केंद्र सरकारने गांभीर्यांने विचार करावा व मी सुचवलेली धोरणे आमलात आणावी व देशातील बळीराजाला न्याय द्यावा ही आपेक्षा व्यक्त करत आहे.

## देशाची संपूर्ण व्यवस्था ३-४ लोकांसाठी चालते

रायपूर : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. लोक विचारतात की राहुल गांधी थकत नाहीत का?, यावर उत्तर देत राहुल यांनी थकत नाही, कारण जनतेचे खूप प्रेम आहे असे म्हटले आहे. भारत जोडो न्याय यात्रा आता छत्तीसगडमध्ये पोहोचली आहे. मणिपूरपासून सुरू झालेला हा प्रवास मुंबईत संपणार आहे. हा प्रवास बिहार, झारखंड, ओडिशा मार्गे छत्तीसगडमध्ये आता पोहोचला आहे.राहुल गांधी म्हणाले की, भाजपा सरकारने नोटाबंदी केली आणि त्यानंतर जीएसटी लागू करण्यात आला. सरकारच्या या निर्णयांमुळे छोटे व्यापारी देशोधडीला लागले. प्रत्येक क्षेत्र काही लोकांमध्ये विभागले जात आहे. सत्ता, संरक्षण, आरोग्य, रिटेल, विमानतळ देशातील कोणत्याही उद्योगात निवडक लोक असतात, याचा अर्थ संपूर्ण यंत्रणा तीन-चार लोकांसाठी चालवली जात आहे. बाकीची जनता महागाई खाली दबली गेली आहे. हा आर्थिक अन्याय आहे.लोकांचा कष्टाचा पैसा लोकांच्या कष्टाचा सर्व पैसा भांडवलदारांच्या कंपन्यांमध्ये जात आहे. त्यांच्या



कंपन्यांमध्ये दलित आणि मागासलेले लोक नाहीत. देशातील विविध क्षेत्रात दलित आणि मागासवर्गीयांचा सहभाग नाही. भाजपा हिंदू राष्ट्राबाबत बोलते, मात्र मागास, दलित, आदिवासी वर्गाला काहीच मिळत नाही. राम मंदिराच्या उद्घाटनाच्या वेळीही एकही गरीब-मजूर शेतकरी दिसला नाही असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.न्याय मिळवून देणे हाच उद्देश लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काँग्रेसने भारत जोडो न्याय यात्रा सुरू केली आहे. लोकांना न्याय मिळवून देणे हा या यात्रेचा उद्देश असल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. याआधी झालेली भारत जोडो न्याय यात्रा दक्षिणेकडील कन्याकुमारी येथून सुरू होऊन उत्तरेकडील काश्मीरमध्ये संपली. मात्र, यावेळी ही यात्रा ईशान्येकडील राज्य मणिपूर येथून सुरू झाली असून, मार्चमध्ये ती मुंबईत संपणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून पक्ष आपला जनाधार मजबूत करत आहे.

# रेणापूर येथील नमो केसरी कुस्ती स्पर्धेत भरत कराड विजेता ठरला येणाऱ्या काळातील राजकीय आखाड्यात विरोधकांना चितपट करणार- आ. रमेशआप्पा कराड

लातूर :- भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रेणापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या नमो केसरी स्पर्धेत रामेश्वर येथील भरत कराड विजेता ठरला. भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते चांदीची गदा आणि ५१ हजार रुपयांचे पारितोषक देऊन भरत कराड यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात नमो चषक २०२४ अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील यशस्वी संघांना आणि खेळाडूंना पारितोषिक वितरण करण्यात आले. येणाऱ्या काळातील राजकीय आखाड्यात विरोधकांना चितपट करणार असल्याचे यावेळी आ. कराड यांनी बोलून दाखविले.

नमो केसरी कुस्ती स्पर्धा रविवारी रेणापूर येथे रंगबेरंगी लाईटच्या प्रकाश झोतात झाली. मराठवाड्यात पहिल्यांदाच तीन फूट उंचीवर झालेल्या कुस्ती स्पर्धेचे अत्यंत दर्जेदार आणि देखने नियोजन भाजपाचे युवा नेते ऋषीकेशदादा कराड यांनी केले होते. रामेश्वर येथील भरत कराड आणि नेकनूर येथील आकिब शेख यांच्यात अखेरची रंजकदार कुस्ती झाली. यात भरत कराड यांनी बाजी मारत विजयाचा मानकरी ठर. ला दरम्यान या कुस्तीच्या आखाड्यात लहान मोठ्या एकूण सव्वा पाच लाख रुपये बक्षिसाच्या अनेक कुस्त्या झाल्या या कुस्त्या पाहण्यासाठी हजारोचा जनसमुदाय उपस्थित होता.

कुस्ती स्पर्धेबरोबरच लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने घेण्यात आलेल्या क्रिकेट कबड्डी खो-खो हॉलीबॉल कॅरम यासह विविध खेळातील विजेते मुले आणि मुली यांच्या संघांना हजारो रुपयांच्या पारितोषकासह स्मृतीचिन्ह प्रशस्तीपत्र भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड जिल्ह्याचे खासदार सुधाकर शृंगारे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. राष्ट्रीय शूटिंग बॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने घवघवीत यश संपादन केले या संघातील लातूर ग्रामीणची कन्या ऋतुजा उरगुंडे हिचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, ज्येष्ठ मार्गदर्शक तुळशीरामअण्णा कराड, प्रगतशील शेतकरी काशीरामनाना कराड, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, पंचायत





राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, भाजपाचे रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, जिल्हा भाजपाचे अनिल भिसे, सतीश आंबेकर, हनुमंतबापू नागटिळक, गोविंद नरहरे, गंगासिंह कदम, संगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, महिला आघाडीच्या अनुसया फड, सुरेखा पुरी, शीला आचार्य, भाजयुमोचे सुरज शिंदे, अमर चव्हाण, संजय ठाकूर, अच्युत कातळे, संतोष राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपीठ मिळावे त्यांच्या गुणांना वाव मिळावा यासाठी नमो चषक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून लातूर ग्रामीण मतदार संघातील ७७ हजार खेळाडूंनी खेळासाठी नोंदणी करून राज्यातील २८८ मतदार संघात नवव्या क्रमांकावर आहे. अनेक संघाने सहभाग नोंदवून चांगली कामगिरी करून दाखवली यशस्वी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून कुस्तीसह सर्वच स्पर्धा अत्यंत चांगल्या पद्धतीने नियोजन करून यशस्वी केल्याबद्दल भाजयुमो कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

भाजपाच्या नेतृत्वातील केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेची आणि यशस्वी कामगिरीची माहिती देऊन नरेंद्रजी मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी मताधिक्य वाढवावे, मेहनत करावी असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, २०१९ मध्ये लातूर ग्रामीण मतदार संघात पैशाच्या जोरावर विजय मिळवला असला तरी देशात एक नंबरचे नोटाला मतदान मिळाल्याने नोटाच्या विरोधात निवडून आलो असे सांगण्याची त्यांच्यात हिंमत नाही. जी माणसं एसीत बसून बंद दारामध्ये राजकारण करतात त्याला सर्वसामान्य जनता आता वैतागली आहे. विधान भवनात मागच्या दाराने जायचे नाही ही कार्यकर्त्यांची इच्छा असल्यामुळे येणाऱ्या काळात होणाऱ्या राजकीय आखाड्यात, कुस्तीच्या फडामध्ये जाऊन कुस्ती खेळायची आणि विरोधकांना चितपट करून कुस्ती जिंकायचीच. कार्यकर्त्यांच्या या इच्छेसाठी मीही रात्रंदिवस काम करतोय असेही त्यांनी बोलून दाखविले.

केंद्र शासनाच्या विविध योजनांची आणि विकास कामाची माहिती देऊन खा. सुधाकर शृंगारे यावेळी बोलताना म्हणाले की, अर्जुनाचा मुलगा अभिमन्यू प्रमाणे ऋषिकेश तरुणातील ऊर्जा वाढविण्याचे काम करत आहेत. कुणीही काहीही विकास कामे केली तर मी केलंय मी केलंय असे सांगण्याचा विरोधक प्रयत्न करीत आहेत, मात्र त्यांना कोणता रस्ता कोणत्या गावाला जातो हे तरी माहित आहे का असा प्रश्न उपस्थित केला.

या कार्यक्रमात युवा नेते ऋषिकेश दादा कराड यांचे तडाखेबाज भाषण झाले त्यांच्या भाषणाला उपस्थितांनी मोठी दाद दिली. २०१९ साली लातूर ग्रामीण मतदारसंघात नूरा कुस्ती झाली. फडात व्हायला हवी होती असे सांगून आम्हा सर्वांची इच्छा आहे या मतदार संघात डाग लागलाच पाहिजे, विरोधकाची पाठ लावलीच पाहिजे. पावसाचे संकट आल्यावर प्रभू श्रीकृष्णाने करंगळी लावून गोवर्धन पर्वत उचलला त्याप्रमाणे मतदार संघावर काहीजणाचं आलेलं संकट घालविण्यासाठी आप्पा, तुम्ही करंगळी लावाच आणि गोवर्धन उचलाच. तुम्ही सांगाल ते धोरण तुम्ही लावाल ते तोरण याप्रमाणे युवा मोर्चाचे कार्यकर्ते जिद्दीने कामाला लागले आहेत असेही ऋषिकेश कराड यांनी बोलून दाखवले.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. दशरथ सरवदे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले शेवटी अमर चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी भाजपाचे शरद दरेकर, सुकेश भंडारे, प्रताप पाटील, श्रीकृष्ण जाधव, भैरवनाथ पिसाळ, श्रीकृष्ण पवार, माधव घुले, शरद राऊतराव, लक्ष्मण नागिमे, श्रीमंत नागरगोजे, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, भागवत गीते, राजाभाऊ आलापुरे, विजय चव्हाण, उज्वल कांबळे, अशोक सावंत, सुरेश गुड्डे, नरेश चपटे, पंकज काळे, चंद्रकांत माने, दत्ता आंबेकर, लहूराजे सव्वाशे, विठ्ठल कस्पटे, अविनाश रणदिवे, राजकुमार नाडे, दीपक पवार, भाऊसाहेब गुळबिले, बाजीराव साखरे, बापूराव बिडवे, रमेश कटके, शुभम खोसे, रमेश चव्हाण, मनोज चक्रे, लखन आवळे, अंतराम चव्हाण, गणेश चव्हाण, किरण मुंडे, सूरज सूर्यवंशी, अक्षय भोसले, ओम चप्पे, अनिकेत बुड्डे, दिलीप चोथवे, गोपाळ पवार, भारत पवार, हरिदास कराड, विकास सरवदे, सिद्धेश्वर मामडगे, सचिन लटपटे, हनुमंत गव्हाणे, हनुमंत साळुंखे, हाजी शेख, राजेश काळे, वाजिद पटेल, दिलीप चव्हाण, गुणवंत जोगदंड, राज जाधव, विजय मोठेगावकर, बाळू पाटील, संदीप संपत्ते, आजिम शेख, गणेश माळेगावकर, सुरज फुलारी, श्रीराम राऊतराव, इकबाल मासूमदार, जयराम जाधव, मच्छिंद्र चक्रे, नवनाथ पांचाळ, राजेश कांबळे, दत्ता जाधव, सचिन लटपटे, मुकेश शिंदे यांच्यासह भाजपाच्या प्रमुखासह भारतीय जनता युवा मोर्चाचे पदाधिकारी कार्यकर्ते क्रीडाप्रेमी नागरिक खेळाडू हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# इंदिरा गांधी ते वाजपेयी ! भारतीय राजकारणाची दिशा बदलणाऱ्या तीन चुका

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला संसदेच्या दोन्ही सभागृहात उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहरू-गांधी घराण्याच्या राजवटीतील चुकांचा पाढा वाचला. यावरून एक प्रश्न निर्माण होतो की, स्वतंत्र भारतात एखाद्या पक्ष किंवा नेत्याने केलेली सर्वात मोठी चूक कोणती आहे?राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला संसदेच्या दोन्ही सभागृहात उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहरू-गांधी घराण्याच्या राजवटीतील चुकांचा पाढा वाचला. यावरून एक प्रश्न निर्माण होतो की, स्वतंत्र भारतात एखाद्या पक्ष किंवा नेत्याने केलेली सर्वात मोठी चूक कोणती आहे?कुणाही एकाचे नाव घेणे कठीण आहे, त्यामुळे आपण तीन उदाहरणे पाहणार आहोत. ही उदाहरणे मागील ५० वर्षांपर्यंतचीच आहेत. तथापि चूक म्हणजे काय हे आधी ठरवायला हवे. एक म्हणजे ते पूर्णतः राजकारणाशी निगडित असेल. विशेष म्हणजे या चुकांनी अनेक दशकांच्या राजकारणावर प्रभाव टाकला आहे. हा प्रभाव जितका जास्त काळ जाणवेल ती चूक तितकीच वाईट असेल.तीन सर्वात वाईट चुका मी सांगू इच्छितो. कालक्रमानुसार मी त्यांची यादी केली आहे.इंदिरा गांधी यांनी आणीबाणीच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) अनेक कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले. यातील अनेक बिनचेहऱ्याचे कार्यकर्ते होते. जनसंघाचे कार्यकर्ते, नेते सोडून ते होते.१९८९ मध्ये राजीव गांधी यांनी १९७ जागा जिंकूनही सरकार स्थापनेचा दावा केला नाही. आपल्याला संपूर्ण बहुमत न मिळाल्यामुळे आपण जनादेशाचा आदर करतो, असे ते म्हणाले. त्या वेळी त्यांचा पक्ष सर्वात मोठा पक्ष होता.२००४ ला मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड राज्यांमधील निवडणुकीत भाजपला विजय मिळाला. या विजयाने उत्साहित होत अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवानी यांनी लोकसभेच्या निवडणुका सहा महिने आधी घेण्याचा निर्णय घेतला.आता तुम्ही मला हा प्रश्न विचाराल की, आणीबाणीला तुम्ही घोडचूक का मानत नाही? आरएसएसच्या स्वयंसेवकांना तुरुंगात टाकण्यालाच चूक का म्हणता? याचे उत्तर सोपे आहे. खरेतर १९७७ ला इंदिरा गांधी यांचा झालेला पराभव हा मतदारांनी त्यांना दिलेली सौम्य शिक्षा होती.तीन वर्षांच्या आतच त्या प्रचंड बहुमताने सत्तेवर परत आल्या. आणीबाणीनंतरच्या ४६ वर्षांत इंदिरा गांधी यांचा पक्ष २५ वर्षे सत्तेत होता. याचा अर्थ असा की, लोकांनी त्यांना माफ केले आहे.आरएसएसला मान्यता त्यांनी आरएसएसवर काही प्रमाणात निशाणा साधला होता. एक म्हणजे इंदिरा गांधींनी 'आरएसएस'ला एक राजकीय शक्ती म्हणून मान्यता मिळवून दिली आणि आपल्या पक्षाचा प्रमुख विरोधक त्यांना मानले. तोपर्यंत कुठल्याही एका विचारसरणीशी न लढणे हे त्यांच्या पक्षाचे बलस्थान होते. काँग्रेसमधीलच काही पुराणमतवादी, काही उजवीकडे झुकलेले, स्वतंत्र पक्षाचे उदारमतवादी भांडवलवादी आणि डावा राजकीय प्रवाह हे त्यांचे विरोधक होते; पण हा लढा कधीच काँग्रेस विचारसरणी विरुद्ध इतर असा नव्हता. इंदिरा गांधी यांनी हे सुरू केले. आरएसएसच्या नेत्यांना मोठ्या प्रमाणात अटक झाल्यामुळे त्यांच्याविषयी लोकांमध्ये आदर वाढला.समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांनीही त्यांना लढ्याचे अग्रभागी असलेले सैनिक म्हणून निवडले. तोपर्यंत कमकुवत झालेल्या काँग्रेसचा एकमेव वैचारिक विरोधक म्हणून जनसंघाचे भारतीय जनता पक्षात रूपांतर झाले. इंदिरा गांधी यांनी आरएसएसवर कारवाई केलीच नसती, तर मोदी दोनदा सत्तेत येऊन तिसऱ्या कार्यकालाची अपेक्षा करत नसते.

सत्तेवर पाणी १९८४-८५ ला ४१४ जागा मिळालेली राजीव गांधींची काँग्रेस १९८९ ला १९७ जागांवर आली. दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असणाऱ्या जनता दलाकडे १४३ खासदार होते. व्ही. पी. सिंह त्याचे सर्वोच्च नेते होते. काँग्रेसने सत्तास्थापनेसाठी दावा न केल्याने भाजप आणि डावे अशा टोकाचे विरोधक असलेल्या पक्षांचा बाहेरून पाठिंबा व्ही. पी. सिंह यांना मिळाला. ही विरोधाभासी युती अल्पजीवी ठरेल आणि ते निवडणुकीला सामोरे जाऊन ते पुन्हा सत्तेत येतील, असा राजीव गांधी यांचा अंदाज होता.त्यांचे अनेक अंदाज चुकले. सर्वात मोठा चुकलेला अंदाज होता लालकृष्ण अडवानी यांच्यासाठी राजकारणाचा मार्ग प्रशस्त करण्याचा. यामुळे भाजप काँग्रेसला राष्ट्रीय पर्याय म्हणून समोर आला. अडवानी यांच्या पक्षाने संसदेत लवकरच तीन अंकी संख्या गाठली.जसजशी काँग्रेस कमकुवत होत गेली, तसतसे भाजपसोबत युती करण्यासाठी १९९८ ला प्रादेशिक पक्ष तयार झाले. 'मंडल पक्ष' आणि डावे या महत्त्वाच्या विरोधकांनी युती केल्यामुळे भाजपवरचा राजकारणातील बहिष्कृत असण्याचा शिक्का पुसला गेला.ही राजीव गांधी यांच्याकडून १९८९ ला मिळालेली भेट होती. काँग्रेसला पुढील १५ वर्षे सातत्याने सत्ता मिळाली; पण ती कमकुवत होत राहिली. या एका चुकीमुळे भारतीय राजकारणातील काँग्रेस युग संपले आणि २०१४ ला भाजपचा उदय झाला.१९७ खासदार असतानाही काँग्रेसने सत्तेत बसण्याची संधी गमावली. पण, पुढील वीस वर्षे (१९९६, १९९८, १९९९, २००४) कमी जागा मिळवणारा पक्ष सत्तेचे नेतृत्व करत राहिला. फक्त २००९ मध्ये काँग्रेसने २०६ जागा मिळवत ही सीमारेषा पार केली.१९९१-९६ या काळातील नरसिंह राव यांचे अल्पमतात असलेले सरकार वगळून आपण फक्त आघाडी सरकारांबद्दल बोलत आहोत. राजीव गांधी यांनी युती-आघाड्यांची अपरिहार्यता ओळखण्यात कमी पडणे, आणि आपल्या विरोधकांसाठी अगदी सहज सत्ता सोडून देणे, यामुळे भारतीय राजकारणाची दिशा बदलली. भाजपचा अतिउत्साह २००४ मध्ये हिंदी हार्टलँडमधील तीन राज्ये जिंकल्यामुळे भाजपचे नेतृत्व उत्साही होते. या राज्यात विजय मिळाल्यामुळे इतर ठिकाणीही विजय मिळेल, असा अंदाज त्यांनी बांधला. प्रमोद महाजन यांच्या नेतृत्वाखालील थिंक टँक आणि अडवानी यांच्या खुषमस्कऱ्यांनी लाटेवर स्वार होण्याचा सल्ला दिला.वाजपेयी यांची प्रकृती पुढील पाच वर्षांत बरी राहील याची शक्यता नव्हती, त्यामुळे अडवानी हेच पुढील उत्तराधिकारी असणार, हाही अडवानी गटाचा यामागील छुपा हेतू होता.

# आरक्षण संपत आहे लाभार्थी झोपेत आहेत

सत्ता चुकिच्या व अज्ञानी मानसाच्या हाती गेल्यावर देशाचे व देशातील जनतेचे काय वाटोळे होते हे देशातील बहुतांश लोक बघत आहेत. सत्ताधारी पक्ष व सरकार यांनी शिक्षण, रोजगार, आरोग्य, महागाई व मुलभूत सुविधेला आधार मानुन राजकारण व सरकारने उपाययोजना करायला पाहिजे. परंतु मुख्य विषय बाजूला सारून नको त्या विषयाला भाजपा मिडीया प्राधान्य देऊन मुळ विषयांवरून दूर्लक्ष केले जाते. नको ते विषय हाताळून लोकांना धर्म व जाती विषयी भावनिक बनवले जाते. कोणतेही सरकार धर्म, जात किंवा इतर वैयक्तिक बाबींवर भावनिक बनवून त्यांचे भांडवल करून मताची झोळी भरत असतील तर हे स्पष्ट आहे त्या पक्षाचे, त्या नेत्याचे कर्म शुन्य आहे म्हणून तो कर्माच्या आधारे लोकांसमोर जाऊ शकत नाही, आपले अपयश लपवण्यासाठी धर्माचा आधार घ्यावा लागतो. जेव्हा जाती धर्माचा आधार घेऊन राजकारण केले जात असेल तेव्हा एक गोष्ट निश्चित असते ती म्हणजे देशातील जनता वेगवेगळ्या सामाजिक समस्यांनी ग्रस्त असते. हजारो वर्षांपासून शिक्षण आणि सत्ता एकहाती घेऊन इतरांना अज्ञानी, अंधविश्वासात आणि मानसिक गुलामीत ठेऊन स्वतः ला श्रेष्ठ समजणारे विकृत लोक देशात होते. कर्मावर गुणावर आधारित श्रेष्ठत्व मिळवता येत नाही म्हणून विषमतेची निर्मीती करून तिला खतपाणी घालून मोठे करण्याचे काम केले. जोपर्यंत विषमता, लोकांचे अज्ञान, अंधविश्वास व पाखंड आहे तोपर्यंत सामाजिक व राजकीय सत्ता एकाच वर्णाच्या हाती असणार आहे. माणसाला माणूस म्हणून ज्या व्यवस्थेने नाकारले ती व्यवस्था किती विकृत असेल याची आज कल्पना ही करणे शक्य नाही. विषमतेला खत पाणी घालून हजारो वर्षांपासून विकृत विचाराची पेरणी करणाऱ्यांना समतावाद, ज्यांना माणूस म्हणून हक्क अधिकार नाकारले अशा लोकांची शैक्षणिक व भौतिक प्रगती होणे म्हणजे हजारो वर्षापासून पेरलेल्या विषमतेचे उच्चाटन होय. आणि हे विषमतेचे उच्चाटन विषमतेवर पोट भरणाऱ्यांसाठी धोक्याची घंटा आहे. गुण व पात्रता न बघता केवळ जात बघुन माणसाकडे बघितले जात असे, जात बघुन समता बंधुता व न्याय नाकारला जात असे. हे सर्व हानुन पाडून प्रत्येक माणासाला माणूस म्हणून हक्क अधिकार बहाल करून सर्वांना समान संधी निर्माण करून दिली. व कोणत्याही ठिकाणी जात धर्म पंथ आणि वंश यानुसार भेद करण्यासाठी प्रतिबंध डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधाना द्वारे केले. संविधानाने जातीची उतरंड तोडून माणसांची रांग तयार केली. ज्या मध्ये जात धर्म पंथ किंवा वंश याचा कोणताही विचार न करता सर्वांना समान हक्क अधिकार निर्माण करून दिले. परंतु संविधानाने समान संधी निर्माण करूनही डोक्यात जातीय व निच विषमता असलेले लोक लोकांना गुणवत्तेचा आधारावर समान संधी देणार नाही याची जाणीव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना होती. म्हणून सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी आणि वर्षांनुवर्षे जाणीव पुर्वक सामाजिक विकासापासून दुर ठेवलेल्या लोकांना प्रवाहात येता यावे म्हणून आरक्षण निर्माण केले. आरक्षण म्हणजे गरीबी हटावचा कार्यक्रम नसुन आरक्षणामुळे प्रतिनिधित्व मिळते. आरक्षणाचा संबंध गरिबीशी किंवा आर्थिक संपन्नतेशी जोडणाऱ्या लोकांच्या बुद्धीची किव येते. संविधानाने दिलेले आरक्षण आजही काही लोकांच्या अवघड जागेचे दुखणे झाले आहे. म्हणून शिक्षण रोजगार आरोग्य व महागाई यावर न बोलता आरक्षणावर बोलुन वाद निर्माण केला जातो. तसे बघितले तर सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करून आरक्षण जवळपास नष्टच केल्या गेले. तरीही आरक्षणावर वाद निर्माण करून, आरक्षणाची चुकिची मांडणी करून आरक्षणाबद्दल लोकांच्या मनात चुकीचे व अज्ञानाचे विचार पेरले जात आहेत आणि भाजपा मिडीया याला व्यवस्थित पणे खतपाणी घालत आहे. आरक्षणाचा संबंध गरीबीशी जोडून अनेक नेते स्वतः ची विद्वता सिद्ध करत आहेत. आरक्षणामुळे वर्षांनुवर्षे दबलेले लोक आता कुठे जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक व इतर महत्वाच्या पदावर जात आहेत. यामुळे सामाजिक प्रेरणा मिळून या प्रवर्गातील शिक्षणाचा व जागृतीचा टक्का वाढत आहे. परंतु ह्याच गोष्टी अनेकांच्या पचणी पडणाऱ्या नाहीत. एक बहाद्दर तर आय ए एस, आय पी एस लोकांशी व इतर आर्थिक परस्थिती जेमतेम असलेल्या लोकांशी जोडून त्यांच्या मुलांना आरक्षणाची गरज नाही असे बोलुन चुकीच्या पद्धतीने आरक्षण मांडले जात आहे. आरक्षण विरोधी लोक त्यांचे काम अहोरात्र करून आरक्षण संपवण्याचे प्रयत्न करत आहेत. आणि आरक्षणाचे लाभार्थी मात्र आरक्षणाचा फायदा घेऊन गप्प बसलेले आहेत. आम्ही वेलसेटल झालो, आमची मुले वेल सेटल आहेत आहेत असे सांगण्यात काही लोकांना गर्व वाटतो. गर्व वाटणे सहाजिकच आहे. कारण संविधानापुर्वी गावात जाण्याचा अधिकार नसलेले लोक संविधानामुळे अधिकारी झाले. गर्व असायलाच पाहिजे. पण ज्यामुळे आपल्याला प्रतिनिधित्व मिळाले ते प्रतिनिधित्वाचे दार पुन्हा बंद होण्याच्या मार्गावर आहे. म्हणून प्रत्येकाने आपापल्या परिने आरक्षण जागृती साठी मोहीम हाती घेणे आणि संविधान व संविधानीक हक्क अधिकारासाठी सर्वांना एकत्र बांधण्याचे काम करणे आवश्यक आहे. फक्त भाषण देऊन, घरात, गाडीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो लाऊन किंवा जयभीम बोलून कोणी आंबेडकरवादी होत नाही. आंबेडकरवादी होण्यासाठी आंबेडकरवाद समजून घेऊन त्या प्रमाणे वागावे लागते. तरच त्यांना आंबेडकरवादी म्हणता येईल. सत्तेचा गैरवापर करून संविधान व संविधानीक हक्क अधिकार संपवण्याचा कट रचत असताना. संविधान व हक्क अधिकार सुरक्षित रहायला पाहिजे यासाठी आरक्षणाच्या लाभार्थी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी यांच्या कडे काय नियोजन आहे? थोडेफार शिकुन आणि भाषणात बाबासाहेब ऐकुन अनेक नेते पक्ष निर्माण झाले परंतू आंबेडकरवादी चळवळ जोमाने चालवणारा, चळवळीच्या नावाखाली दुकानदारी न करणारा, आणि मी बाबासाहेब आंबेडकर व संविधानामुळे मान सन्मान व पैसा कमवत आहे याची जाणीव ठेऊन कमाईमधुन विशिष्ट भाग बाजूला सारून सामाजिक कार्यावर खर्च करणारा असा एखादा व्यक्ती शोधुनही सापडेल का? हा प्रश्न आहे. आरक्षण आणि संविधानीक हक्क अधिकार वाचवायचे असतील तर सर्वांनी एकत्र येऊन आपापली दुकानदारी बंद केली पाहिजे. नोकरदार व कमवत्या वर्गाने चळवळीसाठी वेळ नाही देता आला तरीही पैसा देऊन सहकार्य केले पाहिजे. नवीन तरुण किंवा स्वाभिमानी व निस्वार्थी तरुण चळवळी मध्ये कमी दिसतात याचे कारण आहे ते म्हणजे जर सामाजिक काम करताना एखाद्यावर गुन्हा दाखल झाला तर कोर्ट कचेरी त्याला वैयक्तिक बघावी लागते. सामाजिक समस्येवर जनजागृती करण्यासाठी गावोगावी गल्लोगल्ली फिरावे लागते. बेरोजगार जर तरुण जर जागृती करत असेल तर शिक्षीत कमाई करणारा वर्ग त्याचे ऐकत नाही आणि नोकरदार वर्ग वेळ काढून फिरत नाही. तरीही काही तरुण काही लोक स्वतः च्या खिशातून पैसा खर्च करून जागृती करतात परंतु स्वतः जवळचा पैसा खर्च करून जागृती करण्यावर मर्यादा येतात. एखादा व्यक्ती जागृती करण्यासाठी तयार असेल तरी त्याला फिरण्यासाठी ही पैसा उपलब्ध करून दिला जात नाही ही शोकांतिका आहे. नोकरदार वर्ग बेरोजगार लोकांना दुय्यम समजतात. परंतु दुय्यम तेच लोक आहेत जे वेळ पैसा, बुद्धी निस्वार्थ पणे खर्च करत नाहीत. त्यांची बुद्धीमत्ता त्यांचा पैसा समाजाच्या कामासाठी नसेल तर तो समाजाचा कसा? आर्थिक दृष्ट्या सक्षम लोकांचे आरक्षण काढून घेण्यासाठी काही भ्रष्ट राजकारणी प्रयत्न करत आहेत. आणि जनतेला त्याचे काही गांभीर्य राहले नाही. भ्रष्ट राजकारणी लोकांच्या मते नोकरदार किंवा आर्थिक सक्षम लोकांना आरक्षण कशासाठी पाहिजे. मुळात हा प्रश्न उपस्थित करून त्यावर चर्चा घडवून आणणे हे अज्ञानाचे लक्षण आहे. अज्ञानी लोक नको त्या मुद्यावर चुकीच्या पद्धतीने चर्चा करत आहेत कारण सज्ञानी लोक गप्प आहेत. पैशाच जर समस्या सोडवत असेल आणि सक्षम लोकांना आरक्षणाची गरज नसेल तर आज देशातील आमदार खासदार हे जनतेचा पैसा लुटून करोडो रूपयांचे भ्रष्टाचार केलेले आहेत. मतदार संघात करण्यात येणाऱ्या कामात आमदार खासदार यांना किती टक्के जातात हे गावातील अडाणी मानसाला ही माहिती आहे. आमदार खासदार व त्यांच्या नातेवाईकांची संपती किती झपाट्याने वाढत आहे आणि एकाच घरातील, नात्यातील लोक राजकारणाच्या माध्यमातून जनतेला लुटून कसे श्रीमंत होत आहेत हे त्या त्या मतदार संघात सर्व जनतेला माहिती आहे. शपथपत्रावर खोटी माहिती देऊन निवडणूक अर्ज भरणारे आमदार खासदार तेच शपथपत्र जनतेसमोर मांडून चर्चा करायला तयार होतील का? एकाच घरातील, नातेसंबंधातील लोक एकत्र येऊन जनतेला लुटू शकतात काळा पैसा साठवू शकतात. परंतु इमानदारीने नोकरी करून योग्य तो कर सरकारला देऊन आपल्या कुटुंबांची काळजी घेणाऱ्या नोकरदारांच्या मुलांना आरक्षण नको म्हणतात. जनतेला लुटणाऱ्या लुटारू व त्यांच्या नातेवाईक यांच्यावर मात्र कोणतेही बंधने नाहीत. एकाच घरातील दोन तिन पिढ्या राजकारण करून काळ्या पैशाचे मालक झालेले कितीतरी लोक आहेत त्यांच्या वर कधीच चर्चा होत नाही. आज नोकरी करणाऱ्या नोकरदारांनी पैसा दिला नाही आणि राजकारण करणाऱ्यांनी आपली दुकानदारी बाजूला केली नाही तर येणाऱ्या काळात याच लोकांच्या कुटुंबातील सदस्यांना जास्त त्रास होणार आहे. आरक्षणाचे लाभ घेऊन संसार थाटने योग्य आहे. परंतु आरक्षण संपत असताना झोपेतच राहीले, त्याला गांभीर्याने घेतले नाही तर येणाऱ्या काळात खुप मोठ्या समस्या येणार आहेत. आरक्षण संपवण्याचे काम सुरू असताना आम्ही आरक्षण व संविधान वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरलो नाही तर उद्या आम्हाला घराच्या बाहेरही येता येणार नाही. आर्थिक सक्षम लोकांना आरक्षण नाकारणे आणि शिक्षण महाग करणे म्हणजे सामाजिक मागासलेल्या लोकांचे प्रतिनिधित्वच संपवणे होय. कारण शिक्षणाचा व्यापार होत असताना जे पैशाच्या जोरावर मुलांना शिकवतील त्यांना आरक्षण मिळणार नाही आणि जे गरीब लोक आहेत ते मुलांना शिकवू शकणार नाहीत त्यांना आरक्षण असेल. आरक्षणा विरोधात हा डाव ज्यांना कळाला त्यांनी आरक्षण व संविधान जागृती साठी जिल्ह्यात, तालुक्यात लोक तयार करणे गरजेचे आहे. आज जर गाफील राहीलो आणि गांभीर्य लक्षात न घेता झोपलो तर आरक्षण संपलेच म्हणून समजा.

********

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# कथित देशहितासाठीचे हत्याकांड

अरुंधती देवस्थळे 'देशहितासाठी' हा एक शब्द सुरुवातीला जोडला की कोणत्याही बेकायदा कृत्याला वैधता मिळवून देता येते. मग विरोधकांना भलत्याच गुन्ह्यांत गुंतवून, देशद्रोही ठरवून, केलेला रक्तपातही देशभक्ती ठरतो फिलिपिन्समधील रॉद्रीगो दुतेर्ते यांच्या जुलमी राजवटीचे वर्णन करणारे हे पुस्तक एकाधिकारशाहीकडे वाटचाल करणाऱ्या आणि त्यालाच प्रगती समजणाऱ्या देशांसाठी धोक्याची घंटा वाजविणारे आहे'ओळखपत्रावरील ठिपका' वादात का? विद्यार्थी पोषण आहारासाठी अंडी-केळी योजनेवर कोणते आक्षेप?गेलं वर्षभर एक अस्वस्थपण सतत जाणवत होतं. देशातल्या जनमताचा किंवा अंतरराष्ट्रीय दडपणाचा मुलाहिजा न ठेवता देशोदेशी हुकूमशहा आरामात स्थिरावलेले दिसत आहेत. सत्तेच्या दुरुपयोगाचा आलेखही उंचावत चालला आहे. बेलारूस, रशिया, युक्रेन आणि इराणमध्ये असलेल्या सजग मित्रमैत्रिणींमुळे काही राजकीय दुर्घटनांना वैयक्तिक अनुभवांची किनार मिळाली. नर्गिस मोहम्मदींना शांततेचं नोबेल मिळालं खरं, पण ते स्वीकारण्यापुरती सुटका तर सोडा, नव्याने आरोप ठेवून त्यांची शिक्षा वाढवण्यात आली आहे. हेच बेलारूसच्या आलेस ब्याल्यातस्की यांच्याही बाबतीत घडलं आहे. शस्त्रास्त्रमंडित हुकूमशहांच्या विरोधात उठणारे नि:शस्त्र आवाज आणि त्यांचा परिणाम यांचा वेध घेता घेता लक्षात आलं की प्रत्येक देशात जुलूमशाहीला विरोध करणारी माणसं आपापल्या तऱ्हेने लढ्यांत उतरली आहेत. यात 'पुराव्याने सिद्ध करणाऱ्या' धाडसी पत्रकारांची भूमिका तर वाखाणण्यासारखीच!वर्षाअखेरीस अमेरिकी माध्यमांत जागोजागी दिलेल्या उल्लेखनीय पुस्तकांच्या यादीत 'सम पीपल नीड टू डाय' हे फिलिपिनो पत्रकार पॅट्रिशिया ईवांजेलिस्ताचं रॉद्रीगो दुतेर्ते यांच्या फिलिपिन्समधील दहशतवादी राजवटीवरलं अनुभवकथन दिसत राहिलं. २०१६ च्या निवडणुकांत 'देशांतल्या ड्रग माफियाशी युद्ध पुकारून, सर्व लोकशाहीविरोधी गुन्हेगारांना संपवेन' अशी घोषणा करणारे, आधी अनेक वर्षं दावोचे उपमहापौर, नंतर महापौर व अखेरीस राष्ट्राध्यक्ष झालेले दुतेर्ते सर्वोच्च पदासाठी बहुमताने निवडून आले यात काही आश्चर्यकारक नव्हतंच. पण देशभक्तीची सतत ग्वाही देत, दोषींच्या रक्ताचे पाट रस्त्यावर वाहवीन असं म्हणणाऱ्या दुतेर्तेंनी, मादक पदार्थांच्या माफियाशी बादरायणसंबंध जोडून कित्येक विरोधकांना अक्षरश: संपवलं. अनेक घरांतून उचलले गेले आणि नंतर त्यांचं काय झालं हे कुटुंबाला कळलंच नाही. तुमची मुलं जर मादक पदार्थांचं सेवन करत असतील, बापांनीच त्यांना ताबडतोब संपवून टाकून आमच्या मोहिमेला सहकार्य द्यावं. तशीही ती आमच्या पंजातून सुटणं कठीणच आहेत अशी तोफ त्यांनी निवडून येताच सार्वजनिक व्यासपीठावरून डागली होती. सापडलेल्या प्रत्येकाला, आपण अमली वस्तूंशी कुठलाही संबंध ठेवणार नाही अशी शपथ देऊनही ते मारलेच गेले. देशद्रोहाच्या हास्यास्पद आरोपाखाली एक आकडी वयाची चिमुरडी पोरंही चिरडून टाकली गेली, हे एक भयाण सत्य.

काही माणसं मरायलाच हवी. त्यांना संपवणारा मी तसा वाईट माणूस नाहीये, खरंच नाहीये, पण देश नासवणाऱ्या गुन्हेगारांना माझ्यालेखी क्षमा नाही! हे दुतेर्ते यांच्या निकटतम सहकाऱ्याचं गाजलेलं विधान. सरकारी अधिकाऱ्यांशी, पत्रकारांशी बोलताना, अगदी कोऱ्या चेहऱ्याने केलेलं! पॅट्रिशियाने हे पुस्तक एकाधिकारशाहीने घडवून आलेल्या संहारातून वाचलेल्या आणि आपल्यावर झालेल्या अन्यायांचं वास्तव जगासमोर मांडण्याचं धैर्य दाखविणाऱ्या स्त्री-पुरुषांना समर्पित केलं आहे. ज्यांच्या विरोधात लिहिलं त्यांचीच मुलं सत्तेत आल्याने, राजधानी मनिलात राहून हे पुस्तक लिहिणं म्हणजे पाण्यात राहून शार्क माशांशी वैर करण्यासारखंच होतं. पुस्तकभर नोबेल विजेत्या स्वेतलाना अलेक्सिविने 'चेर्नोबिल'साठी वापरलेल्या पॉलीफोनिक निवेदनशैलीची आठवण येते. कोर्टात दिलेल्या तारीखवार साक्षी आणि सांगितलेल्या कहाण्यांतून हे आत्मकथन उलगडत जातं. मेमरी (शब्दांकित केलेली पार्श्वभूमी), कार्नेज (वीस हजारांवर संख्या गेलेलं हत्याकांड) आणि रेक्विएम (मृतांसाठी केलेली प्रार्थना) अशी तीन भागांत केलेली मांडणी, वाचकांना पूर्ण चित्र दाखवणारी आहे. हत्याकांडाच्या भागांत वेगवेगळ्या पत्रकारांनी आपापले अनुभव सांगितले आहेत. वाट्याला आलेला पहिला खटला किंवा विसर न पडू देणारे अमानुष अनुभव. एक वाक्य टंकलिखित करण्यासाठी जितका वेळ लागत असेल, त्यापेक्षा कमीच वेळ एका माणसाला संपविण्यासाठी लागतो, हे आम्ही अनुभवत होतो, असं त्यात म्हटलं आहे.फिलिपिन्स सात हजार ६४१ बेटांचा सुंदर देश आहे. लुझान, विसायास आणि मिंदनाव या तीन द्वीपसमूहांत विभागलेला आहे. अलीकडच्या इतिहासात, अमेरिकेच्या वर्चस्वाखाली असलेल्या या देशाला १९४६ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर एका नव्या राष्ट्रवादाची सुरुवात झाली आणि हा नवा राष्ट्रवाद अल्पकाळात संपलाही. मग सुरू झालं भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर, गुन्हेगारी आणि बेकायदा कामांच्या शिरजोरीचं देशव्यापी साम्राज्य! पॅट्रिशिया सुरुवातीलाच लिहिते, 'माय जॉब ईज टू गो टू प्लेसेस व्हेअर पीपल डाय. आय पॅक माय बॅग्ज, टॉक टू द सर्व्हायव्हर्स, राइट माय स्टोरीज अँड देन गो होम टू वेट फॉर द नेक्स्ट कॅटास्ट्रोफी. आय डोन्ट वेट व्हेरी लाँग'. डगमगत्या लोकशाहीचे दाखले देणाऱ्या फिलिपिन्सला गेलं अर्धशतक सामाजिक- राजकीय स्थैर्य लाभलेलंच नाही, सामान्य नागरिक शांतीप्रेमी असूनही. गुन्हेगारी, गरिबी आणि हिंसक भ्रष्टाचाराने केलेले सत्तापालट आणि मादक पदार्थांच्या चोरीमारीने प्रस्थापित झालेली बजबजपुरी अशी स्थिती आहे. दुतेर्ते यांचा कालखंड (२०१६-२०२२) हा त्यातला दहशत आणि आंधळ्या हिंसाचाराचा म्हणून कुप्रसिद्ध. १९८५ मध्ये कॉरी अक्विनोंच्या 'पीपल्स पॉवर रेव्होल्यूशन'ने मार्कोस यांची भ्रष्ट हुकूमशाही संपवून आणलेली लोकशाही अल्पजीवी ठरली आणि दुतेर्ते यांच्या सत्ताकाळात एका भयावह वळणावर संपली. सत्तेवर येताच सरकारी यंत्रणेने आरोपी ठरवलेल्यांना, कुठल्याही कायदेशीर बचावाची संधी न देता गोळ्या घालण्याचा सपाटा लावण्यात आला. इतका की देशात 'इजेके' (एक्स्ट्राज्युडिशियल किलिंग्ज) हा एक चलनी शब्द ठरला. सरकारच्या पाठबळाने देशात हिंसेचं वादळ पसरलं आणि दहशतही. जनता दोन सरळ हिश्श्यांत विभागली गेली: दुतेर्ते आणि अदुतेर्ते. अदुतेर्ते म्हणजे राष्ट्रद्रोही, हे समीकरण आलंच. जनसामान्यांची सहानुभूती आणि विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी आपल्या कुटुंबाची श्रीमंती लपवली आणि आपण गरिबीतून वर आलो आहोत अशी प्रतिमा निर्माण केली. सर्वोच्च पद मिळवण्याच्या महत्त्वाकांक्षेसाठी, खऱ्या- खोट्याची भेसळ पुढे राजनीतीचा भागच बनली. दुतेर्तेंच्या वाक्चातुर्याबद्दल ती लिहिते की, त्यांची भाषा उद्दामपणाची वाटली तरी कधी कायद्याच्या कचाट्यात सापडेल अशी नसायची. उदा. आम्ही अमली पदार्थांच्या व्यापाऱ्यांना संपवू ('खून करू' नाही.). वृत्तपत्रांना जुलूमकर्ते घाबरण्याऐवजी, वृत्तपत्रेच त्यांना घाबरू लागली आणि खिळखिळ्या लोकशाहीची उरलीसुरली वाट लागली. हे सगळं होत असूनही बहुसंख्यांचा त्यांच्यावरला विश्वास ढळला नव्हता. मार्ग चुकत असेल कदाचित, पण ते हे सगळं देशासाठीच करताहेत असा भ्रम जनतेच्या मनात रुजलेला होता. कायदा झुगारून हजारोंच्या संख्येने मारले जाणारे नागरिक पाहून २०१८ मध्ये मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या मागणीमुळे इंटरनॅशनल क्रिमिनल कोर्टाने चौकशी सुरू केली. १८ हजारांच्या आसपास बेकायदा हत्या खरोखरच घडल्याचं जाहीर होताच दुतेर्तेंनी फिलिपिन्सचं या न्याययंत्रणेचं सदस्यत्व बंद करून टाकलं. 'गुन्हेगारां'च्या हत्यांत खंड पडू दिला नाही. 'देशहितासाठी' आवश्यक हत्या थांबवण्यासाठी मानवाधिकारवादी, पत्रकार, वकील कोणीही विरोधात उभे झाल्यास त्यांनाही संपवून टाका अशा पोलिसांना आज्ञा दिल्या. गुन्हेगारांचा नि:पात करण्याचं स्वातंत्र्य दिल्याने पोलीस यंत्रणा मात्र खूश होती. देशातील गुन्हेगारीला या अतिरेकामुळे आळा बसला हे खरं, पण आरोपाचा बडगा दाखवून निरपराध्यांकडून विशेषतः शहरातल्या झोपडपट्ट्यांतील रहिवाशांकडून त्यांना न झेपणारे पैसे उकळले गेले हेही खरंच. यंत्रणेनेही अधिकाराच्या उन्मादात वैयक्तिक वैरी उडवून टाकले. काही दिवस तर असे की ती काम करत असलेल्या रॅपलरच्या न्यूजरूममध्ये तासा-तासाला देशात वेगवेगळ्या ठिकाणी मृतांचा आकडा वाढताना दिसत असे.आम्ही हतबुद्ध होऊन एकमेकांची तोंडं पाहात राहायचो. शब्द गोठलेले, आपसांत संभाषण अशक्य झालेलं. तेच तेच शब्द, तीच तीच विशेषणं; बातम्या कसल्या लिहायच्या! पण नाही लिहिलं तर बातम्या दडपण्याच्या सरकारी धोरणाला पत्रकारांच्या सुन्न होण्याने हातभारच लागणार होता, 'बुडालेली', 'आत्महत्या केलेली', 'अपघातात मृत्युमुखी पडलेली', 'गायब झालेली', 'भांडणात बळी गेलेली' मृत व्यक्ती एका आकड्यात दफन होणार होती, हे जाणवलं की उसनं अवसान आणून कम्प्युटरशी झगडत बातम्या लिहीत होतो असं ती म्हणते. लवकरच मृतांची छायाचित्रं छापण्यावर बंदी आली. अशा प्रेतांनी 'मी ड्रग डीलर आहे' किंवा 'ड्रग्ज करणाऱ्यांनो, पुढला नंबर तुमचा आहे' अशा चिठ्ठ्या लावलेल्या असत, भल्या मोठ्या अक्षरात! पॅट्रिशिया गुन्ह्याच्या स्थळी जायची तेव्हा आपलं जीपीएस 'रॅपलर'च्या न्यूजरूमला जोडून जायची, तिला काही झाल्यास निदान सहकाऱ्यांना कळेल तरी की ती आहे कुठे! पुस्तकातल्या एक प्रकरणाचं शीर्षकच 'हाऊ टू किल न डिक्ट'!लोकांना पटतील अशा गोष्टी रचून सांगणे हा दुतेर्ते यांचा हातखंडा. म्हणून त्यांनी आरंभलेलं हत्यासत्र ही लोकांना बरीच वर्षं, देशासाठी पडणारी देशद्रोह्यांची आहूती वाटत राहिली. परस्परांवरचा विश्वास उडाला किंवा दहशतीमुळे तोंडं बंद ठेवणं श्रेयस्कर वाटलं म्हणा, विरोधात फारसं कोणी उभं राहिलंच नाही. पॅट्रिशिया काम करत असे त्या रॅपलरच्या संस्थापक, प्रमुख असलेल्या मारिया रेसांना त्यांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या लढाईसाठी २०२१चा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर झाला आणि फिलिपिन्समध्ये चाललेलं हत्याकांड जगासमोर आलं. भ्रष्टाचाराचं लाजिरवाणं उदाहरण ठरलेल्या आणि त्यापायी देशातून पळ काढावा लागलेल्या दिवंगत फर्डिनांड मार्कोसना २१ फैरींचा सॅल्यूट व राष्ट्रीय नेत्यांच्या कबरींच्या प्रांगणात चिरनिद्रा बहाल करणारे, शर्टाची बटणं सार्वजनीक कार्यक्रमांत उघडून बसणारे, सुंदर स्त्रिया आणि लैंगिक सुखाबद्दल व्यासपीठावरून कोणी न मागितलेली कबुली देणारे, दूतेर्ते! १९२२ मध्ये त्यांनी सत्तेचं सिंहासन सोडलं खरं.

# कॅन्सरला दूर ठेवण्यासाठी 'हे' नक्की खा

२०२२ पासून जागतिक कर्करोग संस्थेने क्लोज द गॅप नावाने ३ वर्षासाठी मोहीम सुरु केली यात कर्करोगाशी संबंधित गैरसमज दूर करणे, कर्करोग बाधित व्यक्ती आणि कुटुंब या दोघांसाठी मदत गट तयार करणे, कर्करोग आणि त्यावरच्या उपायांसाठी योग्य माहिती तयार करून त्याचा प्रसार करणे यासारखे महत्वाचे काम सुरू केले. कर्करोगाशी प्रतिकार करताना केवळ रुग्णच नव्हे तर कुटुंबालादेखील धीराने रुग्णासोबत मानसिक आणि आर्थिक लढा द्यावा लागतो. कर्करोग हा विविध आजारांचे एकत्रीकरण होऊन शरीरावर परिणाम करणारा आजार आहे.कर्करोग पेशीजन्य आजार असल्यामुळे त्यावर करता येणारे उपाय मर्यादित आहेत. कर्करोगाचे निदान झाल्यावर आहारावर अनेक बंधने येतात. अनेकदा कर्करोगावर उपचार करताना भूक कमी लागणे , केवळ द्रव स्वरूपात आहार घेणे अशा मर्यादेत आहाराची आखणी करावी लागते. जितक्या लवकर निदान होईल तितकं रुग्णाचं स्वास्थ्य योग्य उपाय करून जपलं जाऊ शकतं. त्यामुळे सकस आहार घेणे हे कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी अतिशय महत्वाचे आहे .कर्करोग होण्याच्या कारणांमध्ये अनुवांशिकता, शारीरिक अस्वच्छता आणि रासायनिक पदार्थांचा वापर याशिवाय जीवनशैली आणि आहार नियमन संबंधित काही बाबी देखील कारणीभूत आहेत. कुपोषित आहार /अतिरेकी आहार जीवनशैली रोगप्रतिकारशक्ती कमी असणे लठ्ठपणा जीवनसत्वाची कमतरता व्यसनाधीन जीवनशैली ( तंबाखू, दारू ) ही कारणे प्रामुख्याने आढळून येतात. लठ्ठपणा संशोधनाअंती हे लक्षात आले आहे की ३०% कर्करोग रुग्णांमध्ये अवाजवी वाढलेले वजन हा महत्वाचा घटक आहे. विशेषतः अशा रुग्णांमध्ये वजन वाढण्यासाठी साखरेचे अतिरेकी प्रमाण आणि नियमित खाल्ला जाणारे मैदा किंवा मैद्याचे पदार्थ दोन गोष्टी कारणीभूत आहेत. अनेकजणांमध्ये ग्लुकोजचे असंतुलन आणि चयापचय क्रियेचे असंतुलन आढळून येते. शिवाय स्थूलपणामुळे घातक पेशींचं प्रमाण देखील वाढीस लागतं. विशेषतः लठ्ठ पुरुषांमध्ये आतडं , गुदाशय , यकृत, स्वादुपिंड , पोटाचे कर्करोग होण्याचे प्रमाण जास्त आहे. व्यसनाधीनता फुफ्फुस, अन्न नलिका ,आतडे, आमाशय यासारखे पचनसंस्थेशी निगडित कर्करोग होण्यासाठी तंबाखूचे सेवन , मद्यपान कारणीभूत ठरते. धूम्रपान केल्याने स्वादुपिंड, मूत्रपिंड, गर्भाशय याचा कर्करोग होण्याचं संभावना वाढते. तंबाखू तसेच धुम्रपानामुळे आतड्यातील आम्लांची आणि सूक्ष्माणूंच्या संख्येत घट होते तसेच शरीरातील सकस पेशींचे नुकसान होते. हळूहळू रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन कर्करोगाच्या



पेशींचा प्रतिकार करणाऱ्या पेशींचे प्रमाण अत्यल्प होऊन कर्करोग शरीरात घर करू लागतो.सातत्याने केले जाणारे मद्यपान स्वादुपिंडावर अतिरेकी ताण तयार करते आणि जीवनसत्त्वांच्या कमतरतेसाठी कारणीभूत ठरते.जागतिक कर्करोग रुग्णांची टक्केवारी पाहिली तर कर्करोगयाची बाधा होण्यासाठी ४५% रुग्णांमध्ये तंबाखू आणि मद्यपान हे मुख्य कारण आढळून येते.आहार २००४ साली केलेल्या एका संशोधनामध्ये आहारातील काही सवयी कर्करोगाची शक्यता वाढविण्यासाठी करणीभूत ठरल्याचे आढळून आले आहे. उदाहरणार्थ नियमित लाल मांस खाणे आहारात साखरेचे अतिरेकी प्रमाण असणे

ओमेगा ३ आणि ६ चे असंतुलन तंतुमय पदार्थ कमी खाणे किंवा न खाणे अतिरिक्त ऊर्जेचे अन्नपदार्थ खाणे सकस आहार आणि नेमक्या शारीरिक वजनाचा आग्रह करताना कर्करोग टाळण्यासाठी आहारात काही विशेष भाज्या असणे फायदेशीर असल्याचे आढळून आले आहे. कोबी, गाजर, पालेभाज्या , फ्लॉवर यासारख्या भाज्या -ज्यात हरितके ,सल्फोरोफेन आणि इतर पोषणमूल्ये मुबलक प्रमाणात आहेत यांचे सेवन , कडधान्ये , जवस, तेलबिया यांचा नियमित समावेश कर्करोग होण्यापासून संरक्षण करू शकतात. दिवसातून किमान २ फळे खाणाऱ्या लोकांमध्ये कर्करोग होण्याची शक्यता ८५ % इतकी कमी होऊ शकते.बी जीवनसत्त्व , ड जीवनसत्त्व , कॅरोटिनॉइड्स , काही पाचक द्रव्ये , यासारखे पदार्थ कर्करोगमुक्त आहाराचा भाग असणे आवश्यक असते. वरील सगळी पोषणमूल्यं आहारात असल्यास स्तन , गुप्तांग , आतडं यांना कर्करोगाची बाधा होण्याची शक्यता काही प्रमाणात कमी होते. याव्यतिरिक्त फुफ्फुसाच्या कर्करोगापासूनही संरक्षण होऊ शकते. कर्करोगापासून दूर राहण्यासाठी आहार, जीवनशैली आणि स्वच्छता या तिन्ही बाबींकडे लक्ष देणे महत्वाचे आहे.

# थायरॉइडमुळे लठ्ठपणा आलाय? थायरॉइडग्रस्त लोकांनी वजन नियंत्रणात कसे ठेवावे?

थायरॉइडची समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. विशेष करून महिलांमध्ये हा आजार जास्त दिसून येतो. कारण थायरॉइडमुळे लठ्ठपणासारख्या अनेक शारीरिक समस्यांचा सामना करावा लागतो. अशावेळी थायरॉइडग्रस्त लोकांना वजन नियंत्रणात ठेवणे अवघड जाते. याविषयी आहारतज्ज्ञ पल्लवी सावंत यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सविस्तर माहिती सांगितली.

थायरॉइड ग्रंथी आपल्या मानेच्या भागात असतात. मेंदूद्वारे या ग्रंथींवर नियंत्रण ठेवले जाते. ज्यावेळी आपण म्हणतो की, थायरॉइडमुळे वजन वाढलंय तेव्हा समजायचं की थायरॉइड ग्रंथीच्या कार्यावर परिणाम झाला आहे. थायरॉइड ग्रंथी ट्रायआयडोथायरोनिन (ढ३) आणि थारोक्सिन (ढ४) अशी दोन हार्मोन्स स्त्राव करतात. या हार्मोन्समुळे शरीराची चयापचय क्रिया चांगली राहते. शरीरामध्ये ऑक्सिजन पुरवठा होतो, हृदयाची गती चांगली राहते आणि शरीरात उष्णता निर्माण करण्यास मदत करते.थायरॉइडमध्ये हायपरथायरॉइड आणि हायपोथायरॉइड असे दोन प्रकार असतात. हायपोथायरॉइडमध्ये जेव्हा थायरॉइडचे कार्य बिघडते तेव्हा थायरॉइड ग्रंथीला खूप जास्त काम करावे लागते. त्यामुळे चयापचय शक्ती कमी होते, थकवा जाणवतो, श्वास घेताना तुम्हाला त्रास जाणवतो आणि हळू हळू वजन वाढत जाते.जर तुम्हाला हायपरथायरॉइड असेल तर तुम्हाला बद्धकोष्ठतेचा त्रास जाणवू शकतो. तुमची भूक कमी होऊ शकते, याचा परिणाम म्हणून तुमचे वजन वाढू शकते.थायरॉइडची लक्षणे ?थायरॉइड वाढलेले आहे, हे ब्लड टेस्ट केल्यावर कळू शकते पण त्याआधी आपण त्याची लक्षणे जाणून घेऊ या.

१. शरीरावर सारखी सूज येणे
२. खूप जास्त थंडी वाजणे
३. वजन वाढणे
४. खूप जास्त थकवा येणे
४. खूप जास्त चिडचिड होणे
५. स्त्रियांना मासिक पाळीदरम्यान खूप जास्त रक्तस्त्राव होणे
६. थकवा येणे
७. श्वास घेण्यास त्रास होणे

थायरॉइडमुळे वजन का वाढतं ?पल्लवी सावंत सांगतात, आपल्या शरीराची चयापचय क्रिया सुरळीत ठेवणे हे थायरॉइडचे महत्त्वाचे कार्य आहे. याशिवाय थायरॉइड ग्रंथी भूकेवर नियंत्रण ठेवते आणि शरीरात उष्णता निर्माण करते. जर तुम्हाला भूक लागत नसेल तर तुमची पचनक्रिया कमकूवत होऊ शकते. त्याचा परिणाम आपल्या आहाराच्या आवडी निवडीवर होतो. थंडी वाजणे हे थायरॉइडचे महत्त्वाचे लक्षण आहे. जर लोह कमी असेल तर आपल्याला थंडी वाजते. परिणामी आपलं गोड खाण्याकडे कल वाढतो.त्यामुळे चांगला आहार जसे की वरण भात, सॅलेड, पालेभाज्या या गोष्टी आपण खाणे टाळतो आणि त्यात थायरॉइड संतुलित नसेल तर वजन आणखी वाढते. हायपोथायरोडीझमचे प्रमाण स्त्रियांमध्ये जास्त आहे.थायरॉइडग्रस्त असल्यावर वजन कमी कसं करावं ?वजन कमी करताना तुमची थायरॉइडची मात्रा किती आहे, हे आधी तपासावे. त्या मात्रेनुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने थायरॉइडसाठी औषध घ्यावेत. औषधीचे सेवन केल्यानंतर ३० ते ४५ मिनिटे काहीही खाऊ नये. एक असा गैरसमज आहे की, वजन कमी करायचे असेल तर फॅट्स खाऊ नये. जेव्हा तुम्ही आवश्यक फॅटयुक्त पदार्थ खाता, तेव्हा तुमचे वजन कमी होऊ शकते आणि दुसरे म्हणजे तुम्ही खूप जास्त कर्बोदके खाल्ली आणि व्यायाम काहीच करत नसाल तर तुमचे वजन जसे आहे तसे राहू शकते. त्यामुळे थायरॉइड असताना तुम्हाला प्रोटिन्स आणि फॅट्सचा समतोल राखणे महत्त्वाचे आहे. ज्यांना थायरॉइड आहे, त्यांनी सॅलडमध्ये कोबी फ्लॉवर या भाज्या कच्च्या खाणे टाळावे. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी कोणत्या प्रकारचा आहार घ्यावा?पल्लवी सावंत सांगतात, थायरॉइड ग्रस्त लोकांनी शक्यतो घरचे जेवण करावे. सर्व प्रकारची फळे थायरॉइड असणारे व्यक्ती खाऊ शकतात. दिवसातून किमान एक वाटी कडधान्य देखील शिजवून खाऊ शकतात फ्लॉवर, ब्रोकोली, कोबी यांसारख्या भाजी मात्र टाळाव्यात कारण त्यांच्यात असलेल्या गॅट्रोजन थायरॉइड साठी घातक ठरू शकतात. जेवढे तुम्ही घरी शिजवलेले ताजे अन्न खाऊ शकाल तेवढे तुमच्या थायरॉइड ग्रंथी साठी उत्तम आहे.

# प्रभाग क्र. ३ मधील कुष्टरोग्यांना घरकुल योजना देण्याची राष्ट्रवादी किसान सभेची मागणी




लातूरः- महात्मा गांधी कुष्टरोग वसाहात लातूर येथे १९८५ ला सरकार तर्फे ५२ घरे बांधून भेटलेली होती पण त्या आज त्या घराची अवस्था मोडकळीस व पडण्याची स्थितीत झालेली आहे. तसेच आज पर्यंत शासनाने त्यांना आठ अ दिला नाही. त्यामुळे ते कोणत्याही शासकीय योजनेत बसत नाहीत. व ५२ घरातील कुटुंबातील सदस्यांची वाढ झाल्यामुळे बाहेर कोणीही त्यांना किरायाणे घर देत नाही व भिक मागण्या शिवाय पर्याय नाही म्हणून त्यांची घर घेण्याची आर्थिक परिस्थिती नाही व त्यांच्या वाढलेल्या कुंटुबाची कोणीही दखल घेत नाही जर घर पडून कोणतीही जिवीत हाणी झाल्यास त्याला कोण जबाबदार असेल असा सवाल निर्माण होतो. महात्मा गांधी कुष्टधाम मधील जनसंख्या आज जवळ जवळ २०० व्यक्तींच्या आसपास झाली आहे. पण शासनाने आज पर्यंत त्यांचा विचार केला नाही. लवकरात लवकर लातूर शहर महानगरपालीकेने त्यांना त्यांच्या घराचा आठ अ देवून रमाई घरकुल किंवा पंतप्रधान आवास घरकुल योजना द्यावी असे निवेदन राष्ट्रवादी किसान सभेच्यावतीने लातूर शहर महानगरपालिका आयुक्त यांना देण्यात आले. यावेळी राहुल बनसोडे, संतोष उफाडे, श्रावण गवंडी, नवाब शेख, देवानंद कांबळे, अनुसया देडे, गंगुबाई वाघमारे, शेषेराव काळे, काशिनाथ शिंदे, सरूबाई बनसोडे, विशाल देडे, विद्यासागर कांबळे, रूक्मिणी जाधव, दोपता गवळी, मदिनाबी शेख, मुलनबी शेख, सुनिता भंडारे, ओम वाघमारे, विक्रम देडे, सतिष सुर्यवंशी, व्यंकट कांबळे, अमिर शेख इत्यादी उपस्थित होते.

# जेट स्प्रे वापरताय... जरा सांभाळून!

शौच केल्यानंतर वैयक्तिक स्वच्छतेसाठी आधुनिक जगामध्ये जेट स्प्रेचा उपयोग केला जातो, ही आता नवीन गोष्ट नाही. बसल्या जागेवर करावयाची ही स्वच्छता तशी सुविधाजनक व एका दृष्टीने आरोग्यास उपकारकच म्हणायला हवी. जेट स्प्रे वापरताना हातांचा गुदभागाला थेट स्पर्श होत नाही व त्यामुळे संभाव्य आरोग्य धोके टळतात. असे असले तरी या जेट स्प्रेचा सुद्धा आरोग्याला एक धोका संभवतो!गुदभाग हे आयुर्वेदाने एक मर्म सांगितले आहे. मर्म म्हणजे शरीराचा असा भाग जो तुलनेने नाजूक आहे. ज्यावर मांसाचे वा हाडाचे आवरण नसल्याने रक्तवाहिन्या वा नसा तुलनेने त्वचेच्या जवळ व असुरक्षित असतात आणि साहजिकच तिथे इजा होणे कटाक्षाने टाळले पाहिजे. गुदासारख्या अशा नाजूक भागावर ज्याच्या नावामध्येच जेट आहे अशा स्प्रेमधून वेगाने येणार्या पाण्याचा फवारा आदळणे योग्य होईल काय? तो थंड पाण्याचा मारा त्या नाजूक भागाला बाधक होत असेल काय? तशी शक्यता आहे व तसे अनुभवही आहेत. त्यातही विशेषतः थंडीमध्ये जेव्हा वातावरणातल्या गारव्यामुळे पाणी थंडगार होते, कोरड्या हवेमुळे गुदभाग अधिकच कोरडा व हुळहुळा झालेला असतो; तेव्हा थंड पाण्याचा जेट स्प्रे अधिकच त्रासदायक होऊ शकतो. त्यातही ज्या व्यक्ती पित्त प्रकृतीच्या अर्थात कोमल शरीराच्या असतात, ज्यांच्या सर्व अवयवांमध्ये तुलनेने उष्ण रक्ताचा संचार अधिक असतो त्यांना हा जेट स्प्रेचा फवारा तिथल्या लहानशा रक्तवाहिन्यांना इजा करण्याची व गुदभागी सूज निर्माण करण्याची शक्यता असते, तर वातप्रकृतीच्या कृश-सडसडीत शरीराच्या मंडळींमध्ये गुदभागी जात्याच असणारा थंडावा व कोरडेपणा थंड पाण्याच्या वेगवान फवार्यामुळे अधिकच वाढून गुदविकारांना कारणीभूत होऊ शकतो.जाणून घ्या यामागील कारणे सहसा चांगल्या दर्जाचा जेट स्प्रे नवीन असतो, तोवर त्यामधून पाण्याचा फवारा हवा तसा व्यवस्थित येत असतो. मात्र कालांतराने जेट स्प्रेची काही छिद्रे मातीच्या सूक्ष्म कणांनी वगैरे बुजतात , तेव्हा पाण्याचा फवारा योग्य येत नाहीये, या विचाराने तुम्ही पाण्याचा वेग वाढवता.

# आसुड तरी किती ओढावे घसा झाला कोरडा

लातूर : एजाज शेख महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलनानिमित्त दि. १२ फेब्रुवारी रोजी लातूर शहरातून नाट्यदिंडी काढण्यात आली. या नाट्यदिंडीत वासुदेव, गोंधळी, गुगळ यांच्यासह बुरबुर मोचमासुद्धा (कडक लक्ष्मी) सहभागी झाले होते. सकाळी ९ वाजता नाट्यदिंडी निघणार असल्यामुळे सकाळच्या प्रहरी बुरबुर मोचमा आपले सर्व बि-हाड घेऊन गंजगोलाईत हजर झाले होते. सकाळी ९ वाजते, १० वाजले, ११ वाजले तरीही नाट्यदिंडीतचा पत्ता नाही. तब्बल दीड तास उशिराने नाट्यदिंडीत निघाली. अंगावर सपासप आसुड ओढीत निघालेले बुरबुर पोचमा थकुन गांधी चौकात बसले. या रखरखत्या उन्हात आसुड तरी किती ओढावेत ना पाणी ना चहा, अशी खदखद त्यांनी व्यक्त केली.नाट्यदिंडीत डामडौल होता परंतु, माणुसकी कुठेच दिसत नव्हती. पैसे मोजले असल्याने कोणीच कोणाचा विचार करीत नव्हता. सगळे व्हीआयपी रथात विराजमान होते तर रखरखत्या उन्हात वासुदेव, गोंधळी, गुगळ, बंजारा भगिणी एवढेच काय वारकरी म्हणून सहभागी झालेले लहान विद्यार्थी नाट्यदिंडीत मार्गावरुन निघालेले होते.



नाट्यदिंडीतचा प्रारंभ ज्या उत्साहात झाला तो उत्साह गांधी चौकापर्यंतही टिकला नाही. त्यामुळे कलाचंतांचा एक जथ्था हनुमान चौकात, दुसरा जथ्था गांधी चौकात तर तिसरा जथ्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कजवळ होता. नाट्यदिंडी टप्प्या-टप्प्याने निघाली, असे चित्र होते.स्थानिक कलावंतांबाबत प्रचंड उदासीनता महाराष्ट्र शासनाच्या वतीने महासंस्कृती महोत्सव व अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने १०० वे नाट्यसंमेलन लातूरात सुरु आहे. या महोत्सवात बहुतांश कलावंत३ मुंबई-पुण्याचेच आहेत. स्थानिक कलांवंतांबाबत प्रचंड उदासीनता दिसुन येत आहे. प्रसार माध्यमातून ही बाब निदर्शनास आणुन दिल्यानंतर जिल्हा प्रशासनाने स्थानिक निवडक कलावंतांना सादरीकरणाची संधी देण्यात येणार आहे. यासाठी कलावंतांनी १२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजेपर्यंत जिल्हा परिषदेच्या मध्यामिक शिक्षण विभागात नाव नोंदणी करण्याचे आवाहन केले. परंतु, नाराज झालेल्या स्थानिक कलावंतांनी या आवाहनास दाद दिली नाही. याबाबत संबंधीतांकडे चौकशी केली असता एका कलावंताची नोंदणी झाली आहे आणि एकाचा फोन आला होता, नोंद करण्यासाठी आम्ही त्याची वाट पाहत आहोत. स्थानिक कलावंतांना सादरीकरणा कार्यक्रासाठी एका तासाचा वेळ देण्यात आला आहे, असे संबंधीताने सांगीतले. परंतू, एका तासात कोणत्या कार्यक्रमाचे नियोजन केल्याचे विचारले असता त्यांनी माहिती देणे टाळले. स्थानिक कलावंतांच्या नोंदणीसाठी जिल्हा प्रशासनाने जे दोन मोबाईल फोनेचे क्रमांक दिले होते. त्यापैकी एकानेतर फोनच उचलला नाही, अशी तक्रार स्थानिक कलावंतांनी केली आहे.

# नाट्यदिंडीने उडवला वाहतुकीचा बोजवारा

लातूर : प्रतिनिधी महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलनानिमित्त दि. १२ फेब्रुवारी रोजी लातूर शहरातून नाट्यदिंडी काढण्यात आली. सकाळी ९ वाजता निघणारी नाट्यदिंडी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास निघाली. तब्बल अडीच तास उशिराने निघालेल्या नाट्यदिंडीने शहरातील वाहतुकीचा बोजवारा उडाला. कसलेही नियोजन आणि व्यवस्था या नाट्यदिंडीदरम्यान नव्हती. एक कला पथक हनुमान चौकात तर दुसरे कला पथक महात्मा गांधी चौकात अशी परिस्थिती होती. त्या परिणाम वाहतूकीवर झाला. नाट्यदिंडीची हौस पुरविणा-यांनी पुरवून घेतली पण त्याचा सर्वाधिक त्रास सामान्य नागरीकांना झाला. नाट्यदिंडीचा प्रारंभ गंजगोलाई येथून झला. यावेळी आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घूगे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, सिनेअभिनेते मोहन जोशी, भरत जाधव, संकर्षण क-हाडे, स्पृहा जोशी, विजय गोखले आदींचा सहभाग होता. सकाळी ९ वाजता निघणारी नाट्यदिंडी तब्बल अडीच तास उशिराने म्हणजेच सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास निघाली. नाट्यदिंडी निघणार असल्याची माहिती सर्वांना होती. परंतु, याबाबत कसलेही नियोजन नव्हते. नाट्यदिंडी मार्गावरील वाहतूक कोणत्या मार्गावरुन सोडायची आणि त्या मार्गावरील वाहतुकीचे करायचे काय? याचा कुठलाही



विचार किंवा नियोजन झालेले नव्हते. सकाळी ९ वाजता नाट्यदिंडी निघेल आणि शहरातील वाहतूक सुरु होण्याअधी नाट्यदिंडी संपले, असे कदाचीत वाटले असावे की काय? माहित नाही. परंतु, नाट्यदिंडी वाहतुकीचा पुर्णतः बोजवारा उडाला.गंजगोलाई ते दयानंद महाविद्यालय, असा नाट्यदिंडीचा मार्ग होता. गंजगोलाईतून नाट्यदिंडी निघाली त्यामुळे गंजगोलाई ते महात्मा गांधी चौकापर्यंतची वाहतुक अचानक नांदेड रोड व मध्यवर्ती बसस्थानकाच्या मागील रस्त्याकडे वळविण्यात आली, परंतु, या मार्गांवर अधिच वाहतुक सुरु असल्याने या दोन्ही मार्गांवर वाहने समोरासमोर आली आणि वाहतूक कोंडी झाली. नाट्यदिंडी महात्मा गांधी चौकातून पुढे निघताच महात्मा गांधी चौक ते लोकमान्य टिळक चौकापर्यंतच्या रस्त्यावरील वाहतूक सावेवाडीचा रोड व विलासराव देशमुख मार्गाकडे वळविण्यात आली. मात्र याही रस्त्यांवर दुतर्फा वाहतूक सुरु झाल्याने या दोन्ही रस्त्यांवर वाहने समोरासमोर येऊन वाहतूक ठप्प झाली. पुढे लोकमान्य टिळक चौक ते दयानंद महाविद्यालयापर्यंतची वाहूक पर्यायी रस्त्यावर वळवली. त्या रस्त्यांवरही वातूक कोंडी झाली. या नाट्यदिंडीच्या ढिसाळ नियोजनामुळे सामान्य नागरीकांना मात्र तळपत्या उन्हात वाहतूक कोंडीचा प्रचंड त्रास सहन करावा लागला.

# लिफ्ट, स्कायवॉक कामाला सुरूवात रेणुका माता मंदिराच्या टॉवरला धक्का लागू नये, खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे:

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दि.१९ मे रोजी माहूर येथे लिफ्ट व स्काय वॉक भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. एक वर्षाच्या आत सदरील काम पूर्ण करण्याच्या सूचना नितीन गडकरी यांनी भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी सबंधितांना दिल्या. परंतु आठ महिने उलटूनही कामाला कामाला सुरुवात झाली नव्हती याविषयी व्यापारी अधिकारी कंत्राटदारांच्या अनेक बैठका झाल्या परंतु तोडगा निघत नव्हता आता व्यापाऱ्यांचे हस्ते भूमिपूजन करून १ रोजी कामाला सुरुवात करण्यात आलेली आहे. व्यापारी संघाने वन परिक्षेत्र अधिकारी माहूर यांचे नावे त्यांच्या कार्यालयात नोंदविलेल्या आक्षेपात आम्ही ११० व्यापारी सुमारे ६० वर्षांपूर्वीपासून सदर वनजमिनिवर थाटलेल्या दुकानच्या माध्यमातून आपली व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवून भाविकांची सेवा करीत असल्याचा उल्लेख केला आहे. श्रीक्षेत्र माहूरगड विकासा अंतर्गतच्या विविध विकास कामांसाठी आमच्या ताब्यातील राखीव वनजमीन आम्हाला कुठलीही पूर्वसूचना



अथवा लेखी सूचना न देताच सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर जि.नांदेड यांचे नावे वळती केल्याने आमचेवर अन्याय झाल्याचेही त्यात म्हटले आहे. नोंद केलेल्या आक्षेपावर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष दिगंबर रामकृष्ण घोगरे पाटील यांची स्वाक्षरी आहे. त्याची प्रत उपवसंरक्षक नादेड यांना पाठविली आहे.. दर्शनार्थी भाविक स्कायवॉक ब्रिजच्या पहिल्या टप्पावर लिफ्टने पोहोचतील. त्यानंतर काही अंतर चालत पुढे गेल्यानंतर तेथील लिफ्टने दुसऱ्या टप्पावर जातील, तेथून आणखी काही अंतर चालल्यानंतर भाविक तेथील लिफ्टने तिसऱ्या टप्पावर पोहोचविले जातील. हा टप्पा अंतिम असून थेट श्री रेणुकामाता मंदिरा च्या प्रवेशद्वारावर पोहचेल असे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी येणार असून शेकडो वर्षाच्या मागणीनंतर का होईना मंजुरी मिळाल्याने नितीनजी गडकरी यांच्या हस्ते लिफ्टचे काम सुरू होत असल्याने मंदिरातील पुजारी, विश्वस्त, भाविक आणि नागरिकांतून आनंद व्यक्त केला होता. मात्र अद्याप पर्यंत तोडगा न निघाल्याने प्रकल्पाचे काम कधी सुरू होणार याकडे सर्वांच्याच नजरा लागल्या होत्या ते ते काम आता सुरू झालेले आहे. गडावरील ११० दुकाने हटवून हा प्रकल्प पूर्ण होणार आहे त्याआधी दुकानदारांचा जागेचा प्रश्न निकाली काढावा अशी मागणी व्यापारी संघाकडून होत असून पुरात व विभागाने या कामाकडे बारीक लक्ष ठेवणे गरजेचे असून मातेचे मंदिर असलेले बुरुज हे दगड मातीच्या ठिकाणावर असल्याने जेसीबीच्या धक्क्याने या बुरुजाला धक्का लागू नये याची खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे मत येथे आलेले भाविक व्यक्त करत होते.

# ‘भारत जोडो’ यात्रा लवकर संपवणार‘

नवी दिल्ली : राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा सध्या सुरु आहे. पण या यात्रेला ब्रेक लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नियोजित वेळापत्रकापेक्षा ही यात्रा लवकर संपवण्यात येणार असल्याचा विचार काँग्रेसकडून करण्यात येत आहे. दरम्यान, काँग्रेसच्या सुत्रांच्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशात यात्रेमध्ये बदलण्याचा आणि आरएलडीबाबत घडत असलेल्या घडामोडींचा संबंध नाही. तर राहुल गांधींनी यात्रेदरम्यान




लोकांशी जास्तीत जास्त संवाद साधता यावा यासाठी आम्ही त्याचा वेग कमी करण्याचा विचार करत आहोत.त्यानुसार, २० मार्चपर्यंत मुंबईत संपणार असलेली यात्रा आता १० ते १४ मार्च दरम्यान नियोजित वेळेपेक्षा किमान एक आठवडा आधी संपेल कारण गांधींना लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी अधिक वेळ मिळेल. सूत्रांनी सांगितले की, प्रियंका गांधी या आत्तापर्यंत या यात्रेत सहभागी झालेल्या नाहीत.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती, लॉर्ड बुद्ध विहार मित्र मंडळ व विशाखा महिला मंडळ विकास नगर लातूरच्या वतीने

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती, लॉर्ड बुद्ध विहार मित्र मंडळ व विशाखा महिला मंडळ विकास नगर लातूरच्या वतीने

लातूर :- त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त जाहीर व्याख्यान व मान्यवरांच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी पूज्य भिक्खू पय्यानंद थेरो, पूज्य भिक्खू बुद्धशील यांनी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले व पूज्य भिक्खू पय्यानंद थेरो उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की पंचशीला सोबत बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञाचे पालन केल्यास आपल्या जीवनामध्ये जीवनाचे कल्याण होणार आहे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुनि. ज्ञानेश्वरी ताई बटवाड, प्रमुख व्याख्याते म्हणून निर्मलाताई कांबळे महिला जिल्हाध्यक्ष सोलापूर भारतीय बौद्ध महासभा उपस्थित होत्या. विविध क्षेत्रांमध्ये मान्यवरांना पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे याप्रसंगी सत्कार करण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने प्रा. युवराज धसवाडीकर यांची उपप्राचार्य पदी निवड, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त, प्रा. देवदत्त सावंत यांना राष्ट्रीय क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले पुरस्कार प्राप्त, आयुनि. सुनीता शिंदे -आल्टे राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार प्राप्त, कु. वैभवी कांबळे घारगावकर ज्ञानसम्राज्ञी फातिमा शेख साहित्य पुरस्कार प्राप्त, आयुनि. शारदाताई हजारे प्रथम महिला लातूर जिल्हाध्यक्षपदी निवड, आयु. सिद्धार्थ कुसभागे सहाय्यक लेखापाल पदी पदोन्नती अशा विविध मान्यवरांचा या ठिकाणी यथोचित मानसन्मान करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आयुनि. मायाताई आम्रपाल बनसोडे तर सूत्रसंचालन आयु. जयंत कांबळे व आयु. राजेंद्र क्षीरसागर यांनी केले. तर





आभार प्रदर्शन आयुनि शिल्पाताई प्रशांत माकणीकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयु. मनोजकुमार सुर्यवंशी, आयु.आम्रपाल बनसोडे, आयु. विलास आल्टे, आयु. प्रशांत माकणीकर, आयु. शरद कांबळे, आयु. राजाभाऊ उबाळे, आयु. अर्जुन कांबळे, आयु. अक्षय गायकवाड, आयु. श्रीकांत इंगळे, आयु. जय बनसोडे, आयु. आकाश सूर्यवंशी, आयूनि सत्यभामा सूर्यवंशी, आयुनि. क्षीरसागर आई, आयु. छायाताई उबाळे, आयुनि. सुकुमार कांबळे यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाला विकास नगर मधील ज्येष्ठ बौद्ध उपासक उपासिका व युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मुंबई महापालिकेच्या शालेय इमारतीत बसवणार आधुनिक अग्नीशामक उपकरणे.

महापालिका या उपकरणाच्या खरेदीसाठी सुमारे दीड कोटी खर्च करणार. महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये मिळून एकूण ३लाख ९० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहे या शाळासाठी३६५४ उपकरणे खरेदी केले जाणार असून प्रत्येकी ३३०० मोजले जात आहे. या सर्व उपकरणाच्या खरेदीसाठी दीड कोटी खर्च केले जाणार आहे.यासाठी जेटकुल बायोकेमिकल टेक्नॉलॉजी एलएलसी या कंपनीची निवड करण्यात आली आहे.




मुंबई/ शहामत शेख मुंबई महापालिकेच्या शालेय इमारतीमध्ये आधुनिक अग्निशामक उपकरणे बसवण्यात येणार पालिकेच्या ४५० शालेय इमारतीमध्ये सुमारे ३६५४ अग्निशमन उपकरणे बसवण्यात येत आहे जेलफोम फायर स्प्रे अशी उपकरणे आहेत. एखाद्या प्रसंगी आग लावून आपत्कालीन प्रसंग उद्भवल्यास आग आटोक्यात किंवा विझवण्यासाठी आग प्रतिबंधक उपायोजना राबविण्याच्या दृष्टिकोनातून अग्निशामक उपकरणे बसवण्यात येत आहे. यापूर्वी पालिकेच्या शालेय इमारती करिता पारंपारिक अग्निशामक यंत्रे पुरवण्यात आलेले आहे. त्यामुळे दरवर्षी अग्निशमन यंत्रणाची देखभाल पूर्णभरणा करणे गरजेचे असल्याने महापालिकेच्या वतीने आधुनिक अग्निशामक उपकरणे खरेदी करण्याचा निर्णय घेतला.जेलफोम फायर स्प्रे साहित्य अग्निशमक यंत्र म्हणून शालेय विद्यार्थी व शालेय कर्मचारी व संपत्तीच्या दृष्टिने शालेय करता खरेदी करण्यात येत असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले. या उपकरणातून स्प्रे करून आगीवरनियंत्रण मिळू शकतो. फायर स्प्रे करिता तीन वर्षापर्यंत कोणत्याही प्रकारची देखभाल व दुरुस्ती गरज नाही ते वापरण्याकरिता अगदी सोपे व तांत्रिक तथा कुशल मनुष्यबळाची आवश्यकता नाही.म्हणून महापालिका शाळेत आणीबाणीच्या परिस्थितीत आग प्रतिबंधक उपाय योजना म्हणून आधुनिक अग्निशमन यंत्रे खरेदी जात असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले

# ‘अध्र्याच्या शोधात दोन’नाटकाने जिंकली नाट्यरसिकांची मने

लातूर : प्रतिनिधी महासंस्कृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलनानिमित्त आयोजित पूर्वरंगमध्ये दि. ११ फेब्रुवारी रोजी कै. नटवर्य श्रीराम गोजमगुंडे यांच्या ‘रसबहार’ नाट्य संस्था निर्मित व कै. शाम फडके लिखित आणि रवी अघाव दिग्दर्शित ‘अध्र्याच्या शोधात दोन’ या दोन अंकी कौटुंबिक नाटकाने लातूरच्या नाट्य रसिकांची मने जिंकली.या दोन अंकी अंकी नाटकाचा प्रयोग रविवारी रात्री येथील मार्केट यार्डातील स्व. दगडोजीराव देशमुख स्मृति सभागृहात सादर झाला. या नाटकाच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ नेते विक्रम गोजमगुंडे, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, प्रभाकर गोजमगुंडे, युवा उद्योजक तुकाराम पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते नटराजाचे पूजन करण्यात आले. नटराजाच्या पूजनानंतर नाट्य प्रयोगास प्रारंभ झाला.या नाटकात प्रमुख भूमिकेत अजय गोजमगुंडे, सुवर्णा बुरांडे, मंजुषा पाठक, अजय कातपुरे, अविष्कार गोजमगुंडे, सुधीर बिर्ले, राजीव गड्डीमे या



कलाकारांनी आपल्या उत्कृष्ट अभिनय कौशल्याचे प्रदर्शन केले. विशेषत: अजय गोजमगुंडे यांनी रमेश कुलकर्णींची भूमिका साकारताना आपल्या खास शैलीने प्रस्तुत केलेल्या ‘आपण कधी खोटे बोलतच नाही’, या संवादाने रसिकांची दाद मिळवली.या नाटकासाठी प्रकाश योजना सुधीर राजहंस, नेपथ्य नंदकुमार वाकडे, मेकअप व वेषभुषा भारत थोरात, रंगमंच व्यवस्था उदय गोजमगुंडे, प्रवीण गोजमगुंडे, रोहित साळवे यांची होती.


जा.क्र. SYHL-७८/२०२३-२४ दिनांक : १२/०२/२०२४

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती**
**टिचर्स एज्यूकेशन सोसायटी, लातूर द्वारा संचलित,**
**श्री येणेगुरे हायस्कूल, खडक हनुमान, लातूर**
**ता. जि. लातूर**

**शिक्षण सेवक पाहिजेत (१00% अनुदानित)**

संस्था कोड-272801SC003

| अ.क्र. | माध्यम | पद | विषय | एकूण पदे | शैक्षणिक पात्रता | जात संवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | ६ वी ते ८ वी | मराठी | ०१ | बी.ए.बी.एड/ डी.एड | अनुसुचीत जमाती | |

टीप:- शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) विषय घेवून TET-Paper-2/CTET-Paper-2 उत्तीर्ण उमेद्वारांनी अर्ज जाहिराती नुसार ऑनलाईन करणे.

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष
**टिचर्स एज्यूकेशन सोसायटी, लातूर**

स्वाक्षरीत/-
सचिव
**टिचर्स एज्यूकेशन सोसायटी, लातूर**


# उल्हासनगर येथील वालधुनी नदीत होत आहे अनधिकृत मातीचा भरणा

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर शहरातुन वाहणारी नदी ही अनधिकृत बांधकामाच्या विळख्यात सापडली आहे. या नदीच्या पात्रात कोणी ही भूमाफिया येतो आणि अनधिकृत बांधकाम करतो. असाच नदी मध्ये अनधिकृत मातीचा भराव करण्याचा प्रकार समोर आला असुन वडोल गांवातील एस टी पी प्लाँट जवळ नदीच्याच पात्रात मातीचा भराव कोणी तरी टाकत असल्याचे दिसुन आले असुन सदर भराव काढुन टाकन्याची मागणी माजी नगरसेविका सौ. सविता तोरणे यांनी महापालिका आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. उल्हासनगर शहराच्या मध्यभागातुन वाहणारी वालधुनी नदी ही भुमाफियाच्या घशात चालली असुन नदी पात्रात अनेक ठिकाणी अतिक्रमण झाले आहे. तर दर पावसाळ्यात नदीची स्वच्छता ही महापालिके कडुन होत असते. तर नदी पात्र रुंद करण्याची प्रक्रिया सुरु



असतानाच या नदीत मातीचे भराव टाकन्याचे काम सर्रास पणे सुरु आहे. उल्हासनगरातील वडोल गांवच्या एस टी पी प्लाँट समोर वालधुनी नदीच्या पात्रात कोणी तरी भुमाफियाने मातीचा भराव टाकन्याचे सुरु केले आहे. हा मातीचा भराव टाकुन नदीच्या पात्रातच बांधकाम करण्याच्या उद्देशाने सदर भराव टाकत असल्याचे दिसुन येते. दरम्यान सदर भराव काढुन टाकन्यात यावा म्हणुन पॅनल १२ च्या माजी नगरसेविका सौ सविता तोरणे यांनी महापालिका आयुक्त यांना निवेदन दिले आहे. तर हा भराव लवकरात लवकर काढला नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा समाजसेवक शिवाजी रगडे यांनी दिला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE